आरोग्य विभाग यवतमाळ

(महाराष्ट्र शासन)

वैद्यकीय अधिकारी गट–अ ची पदे भरण्याबाबत जाहीरात

जाहीरात कमांक 02/2018-19 जा.क./पदभ/यजिप/आरोग्य/स्था–3/2344-50/2018

दि. 12/10/2018

1) यवतमाळ जिल्हयातील सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट–अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावरील भरती करीता पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

2) संस्थांमध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट–अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर सरळ सेवेने पदभरती करण्यासाठी yavatmal.nic.in व zpyavatmal.gov.in या संकेतस्थळामार्फत अर्जाचा नमुना उपलब्ध करून देण्यात आला आहे.उमेदवाराने सदर अर्ज डाउन लोड करून संपुर्णतः भरलेला अर्ज,मुळ प्रतिज्ञापत्र व आवश्यक त्या कागदपत्राच्या साक्षांकीत प्रतीसह जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. यवतमाळ येथे दिनांक 22/10/2018 पर्यंत (सायंकाळी 5.45 पर्यंत) सादर करावा.

3) पदसंख्या :– 34 (जि.आ.अ.यांचे कडील 18 पदे व जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडील 16 पदे अशी एकुण 34 पदे)

4) पदे भरावयाचा तपशील खालील प्रमाणे

रिक्त पदांची यादी खालील प्रमाणे आहे

| अ.क. | तालुका | प्रा.आ.केंद्राचे नाव | रिक्त पदे | ग्रामिण रूग्णालये | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | यवतमाळ | बेलोरा | 2 | – | – |
| 2 | यवतमाळ | वडगाव पो.स्टे. | 1 | – | – |
| 3 | यवतमाळ | हिवरी | 1 | – | – |
| 4 | कळंब | सावरगाव | 1 | – | – |
| 5 | पांढरकवडा | – | – | उपजिल्हा रूग्णालय, पांढरकवडा | 1 |
| 6 | पांढरकवडा | **पाटण बोरी** | 2 | आदीवासी आश्रम शाळा फिरते पथक पांढरकवडा | 1 |
| 7 | घाटंजी | पारवा | 1 | उपजिल्हा रूग्णालय, घाटंजी | 1 |
| 8 | राळेगाव | वरध | 1 | ट्रामाकेअर युनीट राळेगांव | 5 |
| 9 | मारेगाव | वेगाव | 1 | – | – |
| 10 | मारेगाव | मार्डी | 1 | – | – |
| 11 | वणी | कायर | 2 | – | – |
| 12 | वणी | **राजुर** | 1 | ट्रामाकेअर युनीट वणी | 4 |
| 13 | नेर | माणिकवाडा | 1 | ग्रामिण रूग्णालय, नेर | 1 |
| 14 | नेर | शिरसगाव | 1 | – | |
| 14 | नेर | बोरगाव | 1 | – | – |
| 15 | दारव्हा | बोरी अरब | 1 | – | – |
| 16 | दारव्हा | – | – | ग्रामिण रूग्णालय, लोही | 1 |
| 18 | दारव्हा | – | – | ट्रामाकेअर युनीट दारव्हा | 1 |
| 19 | उमरखेड | – | – | कुटीर रूग्णालय, उमरखेड | 1 |
| | एकुण | | 18 | – | 16 |

एकुण वैद्यकीय अधिकारी गट –अ (एम.बी.बी.एस) ची रिक्त पदे 18+ **16 = 34** पद

वर नमुद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

5) विस्तृत जाहिरात yavatmal.nic.in व zpyavatmal.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उपरोक्त नमुद पदासाठी अर्ज करू इच्छीणा–या उमेदवारांनी वेतन,श्रेणी,पात्रता,वयोमर्यादा,अर्जशुल्क सुचना निवडीचे निकष ईत्यादी तपशीलासाठी संकेतस्थळाला भेट दयावी. उमेदवारांनी अर्जाचा नमुना डाउनलोड करून संपुर्णतः भरून सादर केलेला अर्ज मुळ प्रतिज्ञापत्र व आवश्यक त्या साक्षांकीत प्रती एकत्रीत पणे जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. यवतमाळ भावे मंगल कार्यालयासमोर यवतमाळ येथे दिनांक 22/10/2018 पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठवावा.

टिपः– वरील पदासंदर्भात विस्तृत स्वरूपाची जाहीरात yavatmal.nic.in व zpyavatmal.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

अटी व शर्ती

1) यवतमाळ जिल्हयातील सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत आरोग्य संस्थांमध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट–अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावरील भरती करीता पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

2) संस्थांमध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट–अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर सरळ सेवेने पदभरती करण्यासाठी yavatmal.nic.in व zpyavatmal.gov.in या संकेतस्थळामार्फत अर्जाचा नमुना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

3) उमेदवारांनी अर्जाचा नमुना डावुनलोड करून जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ येथे स्वहस्ते /नोंदणीकृत डाकेने सादर करावा.

4) अपंगासाठीचे आरक्षणः– शासन अधिसुचना सार्वजनिक आरोग्य विभाग क/अपंग/2/55 आ–2 दिनांक 27 जुलै 2004 नुसार अपंग उमेदवारांमधील फक्त क्षीणदृष्टी व अस्थीव्यंग (एका पायाने अपंग ) उमेदवारच सदर पदासाठी पात्र असुन जो उमेदवार अशा प्रकारचे अपंगत्व स्पष्टपणे नमुद केलेले प्रमाणपत्र सादर करेल त्याच उमेदवाराचा सदर भरती प्रकीयेत विचार होईल.

5) वेतनश्रेणी रू 15600–39100 अधिक ग्रेड वेतन रू 5400 व इतर अनुज्ञेय भत्ते शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क.मवैअ–2011/प्र.क.–776/सेवा–3/दिनांक 14 डिसेंबर 2011 अन्वये पदव्युत्तर पदवीकाधारक उमेदवारांना 3 अतिरिक्त वेतनवाढी व पदव्युत्तर पदवीधारकाला 6 अतिरीक्त वेतनवाढी अनुज्ञेय राहतील. त्यामुळे विशेषज्ञ वैद्यकीय अधिका–यांचे वेतन एम.बी.बी.एस.अहर्ताधारक वैद्यकीय अधिका–या पेक्षा जास्त असेल.

6. वय :–

6(1) जाहिरात प्रसिध्दीच्या रोजी वय 38 पेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांचे बाबतीत नियमाप्रमाणे शिथीलक्षम

6(2) शासकीय वैद्यकीय सेवेत स्थायी/अस्थायी बंधपत्रीत स्वरूपात कार्यरत असणा–या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त 5 वर्षा पर्यंत शिथील करण्यात येईल.

6(3) शासन निर्णय सार्वजनीक आरोग्य विभाग क.मैवअ–2011/प्र.क.745/11/सेवा–3 दि. 30 ऑक्टोंबर 2013 या मधील नमुद विषयतज्ञ शाखेतील असाधारण किंवा अतिविषेशतज्ञ शैक्षणीक अहर्ताधारक केलेल्या उमेदवारांच्या बाबत. कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त 10 वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल.

7:– शैक्षणीक अर्हता

7(1) वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) पदासाठी संविधानिक विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी किंवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम 1956 (1956च्या 102) ला जोडलेल्या प्रथम किंवा व्दितीय अनुसुचीत विनिर्दीष्ठ केलेली अन्य कोणतीही अर्हता.

7(2) वैद्यकीय अधिकारी (विशेषतज्ञ) पदासाठी संविधानिक पदासाठी बालरोग चिकीत्सा किंवा शल्य चिकीत्सा किंवा औषध वैद्यक किंवा स्त्रिरोग किंवा बधिरीकरण किंवा मनोविकृत शास्त्र किंवा नेत्र शल्य चिकीत्सा किंवा क्ष–किरण शास्त्र किंवा विकृती शास्त्र किंवा अनुजीव शास्त्र किंवा रक्त संक्रमण या विशेषतज्ञ शाखेतील भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम 1956 (1956च्या 102) ला जोडलेल्या प्रथम किंवा व्दितीय अनुसुचित विर्नीदीष्ठ केलेल्या शाखेतील पदव्युत्तर पदवीका किंवा पदवी

7(3) 22/10/2018 या दिनांकापुर्वी अथवा दिनांकास आंतरवासीता ( Internship) पुर्ण असणारे उमेदवारच पात्र ठरतील.

7(4) शुध्द आयुर्वेद /बी.ए.एम.एस. शैक्षणीक अहर्ताधारक उमेदवारांनी या पदासाठी अर्ज करू नये.